# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२०६
२५६०१२१८
२५६०१२०६
फॅक्स : ०२०-२५६०१२०६

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website : www.unipune.ac.in
E-mail : coe@unipune.ac.in

## अत्यंत महत्वाचे

संदर्भ : परीक्षा/समन्वय/१४२३ दिनांक : ३१ डिसेंबर, २०११

प्रति,
मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये
मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
मा.विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग.

**विषय : विद्यापीठ परीक्षा सुधार कक्षासाठी सूचना पाठविण्याबाबत..**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार परीक्षा आयोजनातील संपूर्ण प्रक्रियेचा अभ्यास करुन सुधारणा करण्यासाठी परीक्षा विभागांतर्गत परीक्षा सुधार कक्ष स्थापन करण्याकरीता व सदर कक्षाची कार्यकक्षा निश्चित करुन त्यासाठी लागणा-या सर्व अनुषंगिक बाबींचा सविस्तर विचार होऊन अहवाल सादर करण्यासाठी समिती गठित करण्यात आलेली आहे.

याबाबत आपणांस विनंती करण्यात येते की, सदर कक्षासाठी आपणांस तसेच आपल्या महाविद्यालय/संस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवक, पालक आणि समाजातील इतर घटक यांना काही सूचना, सुधारणा किंवा उपाययोजना सुचवावयाच्या असल्यास त्या दिनांक ३१ जानेवारी, २०१२ पूर्वी परीक्षा नियंत्रक, पुणे विद्यापीठ, पुणे ७ यांच्याकडे पाठविण्याच्या दृष्टीने सदर बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.शि.मो.आहिरे)
परीक्षा नियंत्रक

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर :**

१. मा.कुलगुरु यांचे कार्यकारी सहायक
२. परीक्षा विभागातील सर्व उपकुलसचिव
३. परीक्षा विभागातील सर्व सहायक कुलसचिव
४. परीक्षा विभागातील सर्व कक्षाधिकारी